या लेखासाठीचे फोटो 'कॉमन' फोल्डरवर 'कोड १,२.जेपीजी' या नावाने दिलेले आहेत. कृपया काढून घेणे.

अद्वैत फीचर्स अँड न्यूज एजन्सी प्रा.लि./१२ जून २००६ /रविवार पॅकेज/12 June 206/संपर्क : पुणे कार्यालय ९५२०-२५४६३११०, मुंबई कार्यालय : ९५२२-२४४६०६२०/२१

आरोग्य विशेष

कोडाचे उपचार आता इंटरनेटवर

# 'क्लिक' करा, नितळ त्वचेसाठी !

- प्रसाद चांदेकर

*त्वचेवर उमटणाऱ्या पांढऱ्या डागांच्या उत्पत्तीविषयी आधुनिक वैद्यकशास्त्रालाही पुरेशी कल्पना नाही. परंतु होमिओपॅथी या मानवी चैतन्याला केंद्रस्थानी मानणाऱ्या वैद्यकशाखेने पांढऱ्या डागांवरील उपचारात लक्षणीय प्रगती केली आहे. होमिओपॅथी शरीरातील नैसर्गिक शक्तींचे सामर्थ्य वाढवून शरीरांतर्गत समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत रुग्णाच्या त्वचेवरील पांढऱ्या डागांमध्ये लक्षणीय घट होते. होमिओपॅथीच्या 'ऑनलाइन' उपचारपद्धतीचा ध्यास घेणारे डॉ. राजेश आणि डॉ. रुपल शाह हे दांपत्य तसेच त्यांच्या 'लाईफ फोर्स' या संस्थेविषयी...*

त्वचेवर पांढरे डाग उमटल्यास त्यांना कोड असे संबोधले जाते. शरीरावर कोड उमटण्यासाठी त्वचेखालील रंगद्रव्यांचा (कलर पिग्मेंटस्) चा अभाव कारणीभूत ठरतो. वैद्यकीय परिभाषेत त्वचेखालील रंगद्रव्ये नाहीशी होणे या स्थितीला 'व्हिटिलिगो' असे म्हणतात. महत्त्वाचे म्हणजे पांढरे डाग उमटणे हा विकार नसून ती एक स्थिती (मेडिकल कंडिशन) आहे. दुर्दैवाने, यासंदर्भात पुरेशी जनजागृती न झाल्याने या प्रकाराकडे आजार म्हणून पाहिले जाते. आखाती किंवा अमेरिकेसारख्या देशातील लोकसंख्येपैकी एक ते दोन टक्के व्यक्तींना हा विकार जडतो. भारतात हे प्रमाण आठ टक्के आहे. इतर देशात त्वचेवर पांढरे डाग आढळल्यास त्याचा बाऊ केला जात नाही. मात्र आपल्याकडे पांढऱ्या डागांकडे अपशकुनाचे निदर्शक या दृष्टीकोनातून पाहिले जाते. त्यामुळे त्वचेवर कोड उमटलेल्या व्यक्तींना समाजाची अवहेलना सहन करावी लागते. त्वचेवर पांढरे डाग वागवणाऱ्या मुलींची लग्ने जुळण्यात अनंत अडचणी येतात. बरेचदा कोडबाधित व्यक्तींना कुवत असूनही विविध संधींना पारखे व्हावे लागते.

मुळात आधुनिक वैद्यकशास्त्राला व्हिटिलिगो उद्भवण्यामागील कारणांचा पुरेसा बोध झालेला नाही. शरीरातील रोगप्रतिकारशक्ती टिकवण्यासाठी सुरू असलेले पेशींचे युद्ध, अनुवंशिकता किंवा संप्रेरकातील असंतुलन (हार्मोनल इंम्बॅलन्स) यासारख्या कारणांमुळे कोड उमटतात. धावपळीच्या जीवनशैलीतून उद्भवलेला ताणतणाव पांढरे डाग निर्माण करण्यास कारणीभूत असतो असाही एक मतप्रवाह आहे. बरेचदा एखाद्या रोगाचा प्रतिकार करताना पेशींमध्ये तुंबळ युद्ध घडून येते. या युद्धात रंगद्रव्यासारख्या चांगल्या पेशींचाही नाश होतो. त्यातून पांढरे डाग उद्भवतात. सातत्याने रबरी हातमोजे, अतीघट्ट कपडे वापरल्यास किंवा औषधांच्या अतिवापराने त्वचेवर कोड उमटते.

हा आजार जडल्यास त्वचेवर दुधाळ पांढऱ्या रंगाचे डाग आढळू लागतात. व्यक्तिनुरुप या डागांचा आकार कमी-जास्त असतो. काही केसेसमध्ये संपूर्ण शरीरच दुधाळ रंगाच्या डागांनी भरून जाते. काही व्यक्तींच्या बाबतीत ओठांच्या कडेला अथवा बोटांच्या टोकावर असे डाग उद्भवल्याचे आढळते. पांढरे कोड अतिशय संथपणे शरीराच्या दोन्ही बाजूंकडे पसरत जातात. या स्थितीतून सुटका व्हावी यासाठी आता होमिओपॅथीने कंबर कसली आहे. मुंबईतील 'लाइफ फोर्स' या संस्थेतर्फे झालेल्या उपचारांमुळे अनेक रुग्णांच्या त्वचेवरील पांढरे डाग नाहीसे झाल्याचे आढळले आहे. या संस्थेतर्फे झालेल्या संशोधनात अनेक निष्कर्ष पुढे आले आहेत. दहा वर्षांपेक्षा जास्त काळ कोडाने बाधित असलेल्या रुग्णाला मोठ्या कालावधीसाठी उपचार घ्यावे लागतात. याउलट पांढऱ्या डागांची समस्या लक्षात येताच उपचारांना सुरुवात करणारे रुग्ण चटकन बरे होतात.

Dr. Shah's websites
classicalhomeopathy.com, leucoderma.com, lichenplanus.com, urticaria.com, asthmaticbronchities,hairfalling.com, savetonsils.com and askdrshah.com

## पांढऱ्या डागांवरील होमिओपॅथीचे उपचार

मानवी जीवनात शरीरातील चैतन्याला अनन्यसाधारण महत्त्व असते. हे चैतन्य मानवाच्या अस्तित्वासाठी, त्याच्या आरोग्यासाठी त्याला जडलेल्या व्याधींसाठी आणि त्या व्याधीमुक्त होण्यासाठीदेखील जबाबदार असते. वैद्यकशास्त्रातील होमिओपॅथी या शाखेने मानवी चैतन्याला केंद्रस्थानी मानले आहे. होमिओपॅथी शरीरातील नैसर्गिक शक्तींचे सामर्थ्य वाढवून शरीरांतर्गत समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत रुग्णाच्या शरीरावरील पांढरे डाग नाहीसे होऊ लागतात. हे उपचार प्रभावी असल्यामुळे अलीकडे मोठ्या महानगरातून कोडावर प्रभावी उपचार करणारे शास्त्र म्हणून होमिओपॅथीला मान्यता मिळत आहे. होमिओपॅथी रुग्णांचे भावनिक स्थैर्य राखण्यात आणि त्याद्वारे मानसिक, शारीरिक तसेच मनोकायिक विकार बरे करण्यावर भर देते.

## इंटरनेट आणि पोस्टाद्वारे उपचार

होमिओपॅथीची लोकप्रियता आणि वाढता प्रसार लक्षात घेऊन 'लाईफ फोर्स' ही संस्था मुंबईमध्ये गेली काही वर्षे पांढरे डाग आणि इतर त्वचाविकारांसाठी होमिओपॅथीचे उपचार देत आहे. काळानुरुप बदलणारी, शास्त्रोक्त पद्धतीने उपचार करणारी आणि उपचारांना संशोधनाची जोड देणारी संस्था असे 'लाईफ फोर्स'चे वर्णन करता येईल. डॉ. राजेश शाह आणि डॉ. रुपल शाह या दांपत्याच्या सुमारे बारा वर्षांच्या संशोधनाचे 'लाईफ फोर्स'च्या उपचारांना पाठबळ लाभले आहे. शाह दांपत्य होमिओपॅथीच्या उपचारांमध्ये आधुनिकता आणण्याचे सातत्याने प्रयत्न करत असते. इंटरनेटच्या माध्यमातून उपचार देण्याचे तंत्र भारतात थोडे उशिराच दाखल झाले. भारतातील रुग्ण आणि काही प्रमाणात डॉक्टरांनाही या माध्यमातून प्रभावी उपचार देणे शक्य होईलच अशी खात्री नव्हती. अशा वेळी डॉ. शाह यांनी माहितीजालाच्या माध्यमातून उपचार देण्याचे आव्हान स्वीकारले. डॉ. शाह 'ऑनलाईन' म्हणजेच इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील सुमारे १२० पेक्षा जास्त देशांमधील रुग्णांना होमिओपॅथीचे उपचार पुरवतात. त्यांच्या प्रयत्नांची 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'नेही दखल घेतली आहे. ऑनलाईन सल्ला पुरवण्यासोबत डॉ. शाह यांनी ५० पेक्षा जास्त आजारांची माहिती पुरवणाऱ्या संकेतस्थळांचीही उभारणी केली आहे. विशेष म्हणजे हा सल्ला पोस्टाद्वारे, दूरध्वनीच्या माध्यमातून किंवा इंटरनेटच्या माध्यमातून मिळवता येतो. विशेष म्हणजे रुग्णाने कोणत्याही भाषेत सल्ला विचारल्यास त्याला प्रतिसाद दिला जातो. रुग्णांची चौकशी केल्यानंतर त्याला त्याच्या आजारांची माहिती सविस्तरपणे

..2/-

कळवणे शक्य व्हावे, यासाठी काही महत्त्वाचे प्रश्न असलेली प्रश्नावली पाठवली जाते. त्याद्वारे डॉक्टरांना रुग्णाच्या आजाराची कल्पना येते आणि उपचारांची सुरुवात केली जाते. रुग्णाने 'लाईफ फोर्स'शी संपर्क साधताना दूरध्वनी क्रमांकांचा वापर केल्यास त्याला एकाही पैशाचा भुर्दंड पडत नाही. कारण ही सेवा मोफत आहे. फोनच्या माध्यमातून माहिती मिळवू इच्छिणाऱ्या रुग्णांनी सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते ८ यावेळेत संपर्क साधावा.

'लाईफ फोर्स' ही संस्था 'इ-प्रिस्क्रिप्शन' या नव्या संकल्पनेद्वारे देशोदशीच्या रुग्णांना जडलेल्या दुर्धर व्याधींवर उपचार करत आहे. विशेष म्हणजे भारतीय मानक संस्थेने या संस्थेच्या अद्ययावत संशोधन केंद्राला 'आयएसओ ९००१ : २०००' या प्रमाणपत्राद्वारे गौरवले आहे. 'लाईफ फोर्स'मध्ये रुग्णाला त्याच्या विकारासंबंधी सांगोपांग माहिती देण्यावर भर दिला जातो. संस्थेत येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या तज्ज्ञांशी चर्चा करण्याची मुभा असते. हे तज्ज्ञ रुग्णाचे विकार जाणून घेतात आणि उपचारांचे विविध पर्याय सुचवतात. 'लाईफ फोर्स' मध्ये सल्ला विनामूल्य मिळत असल्याने सर्वसामान्यांना विकार आणि त्यावरील संभाव्य उपचार यांची सविस्तर माहिती मिळवणे शक्य होते. देशोदेशींच्या रुग्णांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे शक्य व्हावे यासाठी संस्थेतर्फे स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे. सुमारे १२० पेक्षा जास्त देशांमधील रुग्णांनी या कक्षाला प्रत्यक्ष भेट देऊन अथवा इंटरनेटच्या माध्यमातून स्वत:च्या विकारासंबंधी माहिती घेतली आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून डॉ. शाह यांच्याशी संपर्क साधणे शक्य नसल्यास डिमांड ड्राफ्ट, चेक किंवा मनीऑर्डरद्वारे उपचाराच्या खर्चाचा भरणा करता येतो. या व्यवहाराची पूर्तता झाल्यानंतर रुग्णाला त्याच्या आजाराची माहिती सविस्तर कळवणे शक्य व्हावे यासाठी एक प्रश्नावली पाठवली जाते. रुग्णाने ही प्रश्नावली 'लाईफ फोर्स' या संस्थेत पाठवल्यानंतर स्वत: डॉ. शाह त्याच्या व्याधीचा अभ्यास करतात. या अभ्यासातून आजाराचे निदान झाल्यानंतर गोळ्या घरपोच पाठवल्या जातात.

होमिओपॅथीच्या क्षेत्रात नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि प्रॅक्टिस करत असलेल्या डॉक्टरांना होमिओपॅथीच्या अभ्यासक्रमातील प्रगत भागाविषयी प्रशिक्षण देणे हाही संस्थेच्या कार्याचा एक भाग आहे. डॉ. राजेश शाह यांनी फेरम मेटॅलिकम या घटकाच्या वापराबद्दलही सविस्तर लेखन केले आहे. त्यांच्या उपचारांचा अमेरिकेच्या भूतपूर्व राष्ट्राध्यक्षांच्या नातेवाईकांनी तसेच हॉलीवूडमधील ताऱ्यांनीही लाभ घेतला आहे.

अलीकडे वैद्यकीय सेवा महागड्या होत चालल्याच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय सल्ला मोफत देणाऱ्या शाह दांपत्याच्या कार्याची दखल घेणे औचित्याचे ठरते. वैद्यकशास्त्राला समांतर वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्या या दांपत्याचे कार्य नव्या पिढीला प्रेरित करणारे ठरते. अधिक माहितीसाठी : (९५२२) ६७९७८२८९/६७९९३२४२/६७०३१८५५ website : www. askdrshah.com

(अद्वैत फीचर्स)

अद्वैत फीचर्स अँड न्यूज एजन्सी प्रा.लि./२९ मे २००६/ रविवार पॅकेज/29 May 206/संपर्क : पुणे कार्यालय ९५२०-२५४६३११०, मुंबई कार्यालय : ९५२२-२४४६०६२०/२१

आरोग्य विज्ञान

# सोरायसिसला होमिओपॅथीची संजीवनी

- महेश जोशी

*संपूर्ण शरीर टप्प्याटप्प्याने पोखरणाऱ्या सोरायसिसमुळे शारीरिक यातनांबरोबरच मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागते. सोरायसिस या त्वचाविकारावर आधुनिक वैद्यकशास्त्रातही खात्रीशीर उपचारपद्धती नाही. मात्र रुग्णाच्या शरीरातील चैतन्याला केंद्रस्थानी मानून त्याच्यातील नैसर्गिक शक्तीचे सामर्थ्य वाढवणाऱ्या होमिओपॅथीशास्त्रात या आजारावर मात करणारी उपचारपद्धती उपलब्ध आहे. वीस वर्षे याबाबत संशोधन करणाऱ्या डॉ. राजेश शहा यांच्याकडून सोरायसिसविषयी घेतलेली माहिती.*

निरोगी शरीर ही निसर्गाची देणगी असली तरी प्रत्येकालाच ती मिळते असे नाही. जवळपास ८० टक्के लोकांना कुठल्या ना कुठल्या लहान मोठ्या व्याधी असतातच. अशा असंख्य व्याधींपैकीच त्वचाविकार ही एक व्याधी. हृदयविकार, कॅन्सर, एड्स अशा व्याधींच्या तुलनेत त्वचा विकाराकडे फारसे गांभीर्याने बघितले जात नाही. कारण त्याचे परिणामही प्रचंड गंभीर नसतात; मात्र त्वचा विकारातील सोरायसिस हा आजार याला अपवाद आहे. वैद्यकशास्त्राने आज कितीही प्रगती केली असली तरीही आधुनिक वैद्यकशास्त्रात सोरायसिसवर खात्रीशीर उपचार उपलब्ध नाहीत. आधुनिक वैद्यकशास्त्राला सोरायसिसच्या रुपाने पडलेले कोडे होमिओपथी उपचारपद्धतीने सोडवले आहे. भारतीय उपचारपद्धतीच्या सहाय्याने सोरायसिससारख्या अनेक असाध्य रोगांवर मात करता येते. सोरायसिस हा विकार प्रामुख्याने त्वचेवर उद्‌भवतो. त्वचेचे बाह्य त्वचा आणि अंत:त्वचा असे दोन भाग आहेत. सोरायसिस झाल्यास बाह्यत्वचेच्या पेशींची बेसुमार वाढ होते.

जगभरात सोरायसिसग्रस्त रुग्ण आढळतात. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे तीन टक्के लोक सोरायसिसग्रस्त आहेत. विशेषत: युरोपीय देश आणि उत्तर अमेरिकेमध्ये या रुग्णांचे प्रमाण अधिक आहे. भारतातील लोकसंख्येपैकी दोन ते चार टक्के व्यक्ती सोरायसिसग्रस्त आहेत. सोरायसिस होण्याचे नेमके कारण अद्याप समोर आले नसले, तरी काही कारणांमुळे तो होऊ शकतो अशी शक्यता व्यक्त केली जाते. ती कारणे म्हणजे पेशीतील गुणसूत्रांमध्ये होणारे बदल, श्वसनसंस्थेचे विकार, सूर्यप्रकाशाचा अभाव, मानसिक ताण, खाद्यपदार्थाद्वारे अथवा वातावरणाद्वारे उद्‌भवणारी ॲलर्जी, जंतूसंसर्ग आणि रुग्णाच्या शरीरातर्गत यंत्रणेतील बिघाड ही होय. क्लोरोक्वीन, क्लोरप्रोपॅमाईड, लिथियमसारख्या औषधांमुळेही सोरायसिसचा विकार वाढू शकतो.

या बाह्य कारणांव्यतिरिक्त माणसाच्या काही अयोग्य सवयी देखील सोरायसिससाठी कारणीभूत ठरू शकतात. खाण्याच्या अनियमित वेळा, गरजेच्या विरुद्ध आहार, अतिआंबट व खारट पदार्थ खाणे, मद्य आणि तंबाखूचे अतिसेवन यामुळे शरीरात दोषयुक्त विष जमा होते आणि त्याची परिणीती सोरायसिससदृश त्वचाविकारात होते. सोरायसिसचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांना शारीरिक वेदनेबरोबरच मानसिक वेदनांनाही सामोरे जावे लागते. या रोगामुळे त्वचा खपलीसारखी निघून येत असल्याने अतिशय विद्रूप होते. सोरायसिस संपूर्ण शरीरभर पसरल्यावर रुग्ण अतिशय किळसवाणा दिसतो. त्यामुळे समाजाकडून त्याची अवहेलना केली जाते. शारीरिक यातनाही भयंकर असतात. त्यातच भर म्हणजे समाज, कुटुंबाकडून घृणास्पद वागणूक मिळत असल्यामुळे रुग्णाच्या मनात नाउमेदीची भावना निर्माण होते. .

सोरायसिस उद्‌भवण्याची आठ कारणे असली तरी त्याची परिणती त्वचारोगातच होते. त्वचारोगतज्ज्ञ यावर ॲण्टीॲलर्जिक औषधं, स्टेरॉईड्स देतात आणि ते वापरल्याने रुग्णाला त्वरित आरामही मिळतो. रुग्णाला बरे झाल्यासारखे वाटते. परंतु हा दिलासा तात्पुरता ठरतो. त्वचारोगतज्ज्ञांनी दिलेली औषधे घेणे बंद केल्यावर हा रोग पुन्हा डोके वर काढतो. काही दिवस अशा पद्धतीचे उपचार केल्यानंतर सरतेशेवटी कॅन्सरसारख्या व्याधीवर वापरण्यात येणारे मिथोट्रॅक्झेट हे औषध दिले जाते आणि ॲलोपॅथी शास्त्राच्या मर्यादा या ठिकाणी स्पष्ट होतात. यापुढे कुठलीही उपचारपद्धती नसल्यामुळे ती थांबवावी लागते. शिवाय आतापर्यंत दिलेल्या स्टेरॉइड्सचे परिणाम दिसू लागतात. याचे परिणाम इतके भयंकर असतात की रुग्ण अंतर्बाह्य पोखरला जातो. या औषधांमुळे डोळे जाणे, बुद्धिभ्रंश होणे, आतडी कमकुवत होऊन अंतर्गत रक्तस्राव होणे, हाडांमधील कॅल्शिअम कमी होणे, मूत्रपिंड, यकृत खराब होणे, या समस्या उद्‌भवतात. तोपर्यंत, सोरायसिसने शरीर पूर्णपणे पोखरले जाते. माणूस शारीरिक, भावनिक, मानसिक आणि आर्थिकदृष्ट्याही पूर्णपणे खंगलेला असतो.

वैद्यकीय विज्ञान दिवसागणिक प्रगत होत आहे, यात वाद नाही; परंतु सोरायसिसपुढे ॲलोपथीने हात टेकले. या रोगाला ॲलोपथी या वैद्यकशास्त्रात औषध नाही. होमिओपॅथीच्या सुमारे २०० वर्षांपूर्वी उदयास आलेल्या शास्त्रात मात्र सोरायसिसशी साधर्म्य असलेल्या रोगाचा उल्लेख आहे. होमिओपॅथीनुसार मानवी जीवनात शरीरातील चैतन्याला अन्यन्यसाधारण महत्त्व असते. या शाखेने मानवी चैतन्याला केंद्रस्थानी मानले आहे. हे चैतन्य मानवाच्या अस्तित्वासाठी, त्याच्या आरोग्यासाठी तसेच त्याला जडलेल्या व्याधींसाठी आणि त्यातून मुक्त होण्यासाठी देखील जबाबदार असते. होमिओपॅथी शरीरातील नैसर्गिक शक्तींचे सामर्थ्य वाढवून शरीरांतर्गत समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत रुग्ण व्याधीमुक्त होतो. हे उपचार प्रभावी असल्याने अलीकडील त्वचा विकाराची प्रभावी चिकित्सा करणारे शास्त्र म्हणून होमिओपॅथीला मान्यता मिळत आहे.

होमिओपॅथी या शास्त्रात नमूद केलेल्या उपचारपद्धतीनुसार 'लाईफ फोर्स' ही संस्था गेली वीस वर्षे वाटचाल करत आहे. या संस्थेत सोरायसिससारख्या जुनाट आणि गुंतागुंतीच्या आजारांवर स्वतंत्र संशोधन करून विकसित केलेल्या उपचारपद्धतीचा वापर केला जातो. इथे सोरायसिसच्या रुग्णांना संशोधनाद्वारे विकसित केलेल्या 'न्यूरोबॅन्ड टारगेटेड फोटोथेरपी'चे उपचार दिले जातात. यात विशिष्ट यंत्रणेच्या माध्यमाद्वारे अर्धा ते दोन सेकंदापर्यंत उपचार दिले जातात. या उपचारांची सुमारे वीस वेळा पुनरावृत्ती करावी लागते. या सोबत तोंडावाटे घेण्याची होमिओपॅथीची औषधेही दिली जातात. या दोन तंत्रांची सांगड घालून दिलेल्या उपचारांमुळे दीड ते दोन महिन्यात रुग्ण बरा होऊ लागतो. महत्त्वाचे म्हणजे होमिओपॅथीची उपचारपद्धती सर्व वयोगटातील रुग्णांना लागू पडते. बरेच रुग्ण ॲलोपॅथीच्या माध्यमातून उपचार घेतल्यानंतर होमिओपॅथीकडे वळण्याचा निर्णय घेतात. त्यामुळे या संस्थेत येणाऱ्या रुग्णांचे शरीर उपचाराला विलंब झाल्याने संपूर्णपणे पोखरलेले असते. शक्य तितक्या लवकर रुग्ण उपचारासाठी येथे आला तर आजार लवकर नियंत्रणात येण्यास

..2/-

मदत होते. मात्र आजाराच्या अखेरच्या टप्प्यात असणाऱ्या हे रुग्णदेखील होमिओपॅथीच्या उपचारांमुळे बरे झाल्याची उदाहरणे आहेत.

एका रोगातून दुसरा रोग उद्‌भवत असतो, त्याप्रमाणेच सोरायसिस बळावल्यानंतर 'सोरायटिक आर्थ्रायटिस' हा सांधेदुखीचा विकारही डोके वर काढतो. 'लाईफ फोर्स'च्या संशोधन विभागाने विकसित केलेल्या उपचारपद्धतीमुळे सोरायसिसमधून उद्‌भवणाऱ्या सांधेदुखीलाही आळा बसतो. या संस्थेमध्ये रुग्णाला त्याच्या विकारासंबंधी सांगोपांग माहिती देण्यावर भर दिला जातो. हा सल्ला विनामूल्य मिळत असल्याने सर्वसामान्य रुग्णांना आपले विकार आणि त्यावरील संभाव्य उपचार याबाबत माहिती मिळवणे शक्य होते. देशोदेशींच्या रुग्णांशी संपर्क साधणे शक्य व्हावे यासाठी संस्थेतर्फे स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे. सुमारे ११८ देशांमधील रुग्णांनी या कक्षाला प्रत्यक्ष भेट देऊन अथवा इंटरनेटच्या माध्यमातून चौकशी करून व्याधींबाबत विशेषत: सोरायसिसबाबत माहिती मिळवली आहे. या संस्थेतर्फे केवळ सोरायसिसच नव्हे तर इतर तीस व्याधींबद्दलही माहिती दिली जाते. संस्थेने तयार केलेल्या संकेतस्थळांच्या माध्यमातून रुग्णांना होमिओपॅथीच्या उपचारांबद्दल जाणून घेणे शक्य होते.

वैद्यकीय सेवा महागड्या होत असल्यामुळे वैद्यकीय सल्ला मोफत देणाऱ्या या संस्थेची दखल घेणे औचित्याचे ठरते. विशेष म्हणजे हा सल्ला पोस्टाद्वारे, दूरध्वनीच्या माध्यमातून किंवा इंटरनेटच्या माध्यमातून मिळवता येतो. इथे रुग्णांना मल्याळम, तामिळ, मराठी, पंजाबी, गुजराती आणि हिंदी यापैकी कोणत्याही भाषेत सल्ला विचारल्यास प्रतिसाद दिला जातो. इतकेच नव्हे तर फ्रेंच, अरेबिक, चायनीज, इंग्लिश आणि स्पॅनिश या परदेशी भाषांमधूनही सल्ला देण्याचे काम इथे अव्याहतपणे सुरू असते. हेल्पलाईन : ९५२२-५५९७८२८९/५५९९३२४२/५५०३१८५५ website : www.e-psoriasis.com

(अद्वैत फीचर्स)

आरोग्य विशेष

# होमिओपॅथीचे उपचार... ऑनलाईन !

- प्रसाद चांदेकर

*बरेचदा शारीरिक तसेच मनोकायिक विकारांपुढे प्रगत वैद्यकशास्त्रही हात टेकते. यानंतर रुग्ण होमिओपॅथीसारख्या समांतर चिकित्सेकडे वळतो. ही शाखा शरीरातील नैसर्गिक शक्तींचे सामर्थ्य वाढवून शरीरांतर्गत समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत रुग्ण व्याधीमुक्त होतो. या प्रभावी उपचारपद्धतीचा डॉ. राजेश आणि डॉ. रुपल शहा या दांपत्याने 'लाईफ फोर्स' या संस्थेच्या माध्यमातून जगभर प्रसार करण्याचा ध्यास घेतला आहे. त्याविषयी...*

अलीकडे समांतर वैद्यकशास्त्राला महत्त्व येत आहे. अत्याधुनिक उपचारपद्धती देऊ करत असलेले उपचार अपुरे असल्याचे जाणवून अनेक रुग्ण होमिओपॅथी, नॅचरोपॅथी, अॅरोमापॅथी यांसारख्या इतर उपचारपद्धतींकडे वळत आहेत. दुर्दैवाने यापैकी बऱ्याच व्यक्ती अखेरचा उपाय म्हणून या शाखांकडे वळत असल्याने या शाखा देऊ करत असलेल्या उपचारांवर मर्यादा येतात. अशा अडचणींवर मात करून होमिओपॅथीचा मोफत सल्ला देऊन प्रसार करण्याचा वसा डॉ. राजेश शहा आणि डॉ. रुपल शहा या दांपत्याने जपला आहे.

मानवी जीवनात शरीरातील चैतन्याला अनन्यसाधारण महत्त्व असते. हे चैतन्य मानवाच्या अस्तित्वासाठी, त्याच्या आरोग्यासाठी त्याला जडलेल्या व्याधींसाठी आणि त्या व्याधीमुक्त होण्यासाठीदेखील जबाबदार असते. वैद्यकशास्त्रातील होमिओपॅथी या शाखेने मानवी चैतन्याला केंद्रस्थानी मानले आहे. होमिओपॅथी शरीरातील नैसर्गिक शक्तींचे सामर्थ्य वाढवून शरीरांतर्गत समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत रुग्ण व्याधीमुक्त होतो. हे उपचार प्रभावी असल्यामुळे अलीकडे मोठ्या महानगरातून समांतर वैद्यकीय चिकित्सा करणारे शास्त्र म्हणून होमिओपॅथीला मान्यता मिळत आहे. होमिओपॅथीचे शास्त्र सुमारे दोनशे वर्षांपूर्वी जर्मनीमध्ये उदयाला आले. होमिओपॅथी रुग्णांचे भावनिक स्थैर्य राखण्यात आणि त्याद्वारे मानसिक, शारीरिक तसेच मनोकायिक विकार बरे करण्यावर भर देते.

होमिओपॅथीची लोकप्रियता आणि वाढता प्रसार लक्षात घेऊन 'लाईफ फोर्स' ही संस्था मुंबईमध्ये गेली काही वर्षे होमिओपॅथीचे उपचार देत आहे. काळानुरुप बदलणारी, शास्त्रोक्त पद्धतीने उपचार करणारी आणि उपचारांना संशोधनाची जोड देणारी संस्था असे 'लाईफ फोर्स'चे वर्णन करता येईल. डॉ. राजेश शहा आणि डॉ. रुपल शहा या दांपत्याच्या सुमारे बारा वर्षांच्या संशोधनाचे 'लाईफ फोर्स'च्या उपचारांना पाठबळ लाभले आहे. शहा दांपत्य होमिओपॅथीच्या उपचारांमध्ये आधुनिकता आणण्याचे सातत्याने प्रयत्न करत असते. इंटरनेटच्या माध्यमातून उपचार देण्याचे तंत्र भारतात थोडे उशिराच दाखल झाले. भारतातील रुग्ण आणि काही प्रमाणात डॉक्टरांनाही या माध्यमातून प्रभावी उपचार देणे शक्य होईलच अशी खात्री नव्हती. अशा वेळी डॉ. शहा यांनी माहितीजालाच्या माध्यमातून उपचार देण्याचे आव्हान स्वीकारले. डॉ. शहा 'ऑनलाईन' म्हणजेच इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील सुमारे १५० पेक्षा जास्त देशांमधील रुग्णांना होमिओपॅथीचे उपचार पुरवतात. त्यांच्या प्रयत्नांची 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने २००४ मध्ये दखल घेतली. ऑनलाईन सल्ला पुरवण्यासोबत डॉ. शहा यांनी ५० पेक्षा जास्त आजारांची माहिती पुरवणाऱ्या संकेतस्थळांचीही उभारणी केली आहे.

'लाईफ फोर्स' ही संस्था 'इ-प्रिस्क्रिप्शन' या नव्या संकल्पनेद्वारे देशोदशीच्या रुग्णांना जडलेल्या दुर्धर व्याधींवर उपचार करत आहे. होमिओपॅथीने दाखवलेल्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्या या संस्थेत जुनाट आणि गुंतागुंतीच्या आजारांना उपचार दिले जातात. देशभरात ११० पेक्षा अधिक केंद्रांमार्फत उपचार देणाऱ्या 'लाईफ फोर्स'ची कार्यालये अमेरिकेतही आहेत. या कार्यालयांच्या माध्यमातून जगभरातील रुग्णांना शहा दांपत्याशी संपर्क साधून उपचार घेणे शक्य होते. विशेष म्हणजे भारतीय मानक संस्थेने या संस्थेच्या अद्ययावत संशोधन केंद्राला 'आयएसओ ९००१ : २०००' या प्रमाणपत्राद्वारे गौरवले आहे. 'लाईफ फोर्स'चे प्रणेते डॉ. शहा हे सातत्याने होमिओपॅथीच्या शाखेत संशोधन करून प्रभावी औषधे शोधून काढण्यात मग्न असतात. ही औषधेच 'लाईफ फोर्स'च्या उपचारांचा कणा ठरली आहे.

अलीकडचे डॉक्टर दर्जेदार सेवा देत असले तरी त्यांना रुग्णांशी सविस्तर बोलण्यास वेळ नसतो. मग रुग्णांना सखोल मार्गदर्शन करणे तर दूरच राहिले. 'लाईफ फोर्स'मध्ये मात्र रुग्णाला त्याच्या विकारासंबंधी सांगोपांग माहिती देण्यावर भर दिला जातो. आवश्यक वाटेल तेव्हा रुग्णाला समुपदेशन (सल्ला आणि मार्गदर्शन) देखील केले जाते. संस्थेत येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या तज्ज्ञांशी चर्चा करण्याची मुभा असते. हे तज्ज्ञ रुग्णाचे विकार जाणून घेतात आणि उपचारांचे विविध पर्याय सुचवतात. 'लाईफ फोर्स'मध्ये सल्ला विनामूल्य मिळत असल्याने सर्वसामान्यांना आपले विकार आणि त्यावरील संभाव्य उपचार यांची सविस्तर माहिती मिळवणे शक्य होते. देशोदेशींच्या रुग्णांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे शक्य व्हावे यासाठी संस्थेतर्फे स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे. सुमारे १८० देशांमधील

## डॉ. शहा यांची संकेतस्थळे

'क्लासिकल होमिओपॅथी.कॉम', 'इसोरायसिस.कॉम', 'ल्युकोडर्मा.कॉम', 'नेफ्रॉटिकसिंड्रोम.कॉम', 'अस्थमॅटिकब्रॉंकायटिस.कॉम', 'सेव्हटॉन्सिल्स.कॉम', 'अल्सरेटिव्हकोलायटिस.कॉम', 'इरिटेबलबॉवेल्ससिंड्रोम.कॉम' 'हेअरफॉलिंग.कॉम', 'लिचेनप्लेनस.कॉम', 'आस्क डॉ. शहा.कॉम' इत्यादी.

## 'लाईफ फोर्स'च्या कार्याची व्याप्ती

'लाईफ फोर्स'मध्ये निरनिराळ्या ॲलर्जी, ब्रॉंकायटिस, पाठदुखी, फिशर, अल्सर, हेपेटायसिस, टॉन्सिल्स, आर्थरायटिस, कर्करोग, एग्झिमा, मायग्रेन अर्थात अर्धशिशी, वॉर्ट्स्, केस गळणे, सातत्याने उद्भवणारी सर्दी, सायनेसायटिस, दमा इत्यादी विकारांवर उपचार केले जातात. या उपचारांमागे डॉ. राजेश आणि डॉ. रुपल शहा या दांपत्याचा वीस वर्षांचा अनुभव आहे. या दांपत्याने गेली दोन दशके होमिओपॅथीचा तपशिलवार अभ्यास केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर डॉक्टर आणि प्रपाठक अशी ओळख असणारे शहा दांपत्य देशात तसेच परदेशातील हॉमिओपॅथीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळांचे आयोजन करत असते. या दांपत्याने आजवर इंग्लंड, हॉलंड, अमेरिका, आयर्लंड, क्रोएशिया, नॉर्वे, ग्रीस, जपान, स्वीडन आणि झेक रिपब्लिक या देशांमधून कार्यशाळांचे आयोजन केले आहे.

..2/-

रुग्णांनी या कक्षाला प्रत्यक्ष भेट देऊन अथवा इंटरनेटच्या माध्यमातून स्वत:च्या विकारासंबंधी माहिती घेतली आहे.

होमिओपॅथीच्या क्षेत्रात नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि प्रॅक्टिस करत असलेल्या डॉक्टरांना होमिओपॅथीच्या अभ्यासक्रमातील प्रगत भागाविषयी प्रशिक्षण देणे हाही संस्थेच्या कार्याचा एक भाग आहे. विकसित देशांमध्ये ॲलोपॅथीचा अभ्यास मोठ्या प्रमाणात होत असला तरी तेथील वैद्यकीय व्यावसायिकांना होमिओपॅथीबद्दल जाणून घेण्याची विशेष उत्सुकता असते. त्यामुळे विविध देशांमधील वैद्यकीय तज्ज्ञ 'लाईफ फोर्स'च्या प्रशिक्षणात सहभागी होतात.

'होमिओपॅथी इंडिया प्रा. लि.' आणि 'होमिओपॅथी इंडिया फाऊंडेशन' या दोन संस्थांचे संचालकपद भूषवणारे शाह दांपत्य 'होमिओपॅथी टाइम्स'चे संपादक म्हणूनही कार्यरत आहेत. डॉ. राजेश शहा यांनी फेरम मेटॅलिकम या घटकाच्या वापराबद्दलही सविस्तर लेखन केले आहे. ते 'माय एक्सपिरिअन्सेस व्हिथ फेरम मेटॅलिकम' या ग्रंथाद्वारे प्रकाशितही झाले आहे. डॉ. शहा मुंबई विद्यापीठाशी संलग्न सीएमपीएच महाविद्यालय आणि हॉस्पिटल येथेही प्राध्यापकाच्या भूमिकेतून कार्यरत होते. शहा दांपत्याचे लेखनही सातत्याने प्रकाशित होत असते. अमेरिकेच्या भूतपूर्व राष्ट्राध्यक्षांच्या नातेवाईकांनी तसेच हॉलीवूडमधील काही ताऱ्यांनीही डॉ. शहा यांच्या होमिओपॅथी उपचारांचा लाभ घेतला आहे.

अलीकडे वैद्यकीय सेवा महागड्या होत चालल्याच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय सल्ला मोफत देणाऱ्या शहा दांपत्याच्या कार्याची दखल घेणे औचित्याचे ठरते. विशेष म्हणजे हा सल्ला पोस्टाद्वारे, दूरध्वनीच्या माध्यमातून किंवा इंटरनेटच्या माध्यमातून मिळवता येतो. विशेष म्हणजे हा सल्ला संपूर्णपणे मोफत दिला जातो. तसेच रुग्णाने कोणत्याही भाषेत सल्ला विचारल्यास त्याला प्रतिसाद दिला जातो. वैद्यकशास्त्राला समांतर वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्या या दांपत्याचे कार्य नव्या पिढीला प्रेरित करणारे ठरते.

अधिक माहितीसाठी : (९५२२) ५५९७८२८९/ ५५९९३२४२/५५०३१८५५ website : www. askdrshah.com

(अद्वैत फीचर्स)